श्री गजानन प्रसन्न

# डीड ऑफ असाईनमेंट (अभिहस्तांतरण )

डीड ऑफ असाईनमेंट (अभिहस्तांतरण) आज दिनांक --, माहे -----, सन २०२६, वार ----**वार**, इसवी ते दिवशी....

**१. सौ. कबिता चुनीलाल गुरिया** )
वय: ३५ वर्षे, धंदा : गृहिणी, )
पॅन नं. **BNVPG2233A** ) लिहून घेणार
मोबाईल नं.८९९९२ ९३२१८ )

**२. श्री. चुनीलाल रणजित गुरिया** )
वय : ४८ वर्षे, धंदा : व्यवसाय, )
पॅन नं. **AQJPG3076F** ) लिहून घेणार
मोबाईल नं.७९७२४ ६५४५३ )
दोघे राहणार : मंडळ भवन, हाऊस नं.८८२/२, )
स. नं.१५, वडगाव बु., पुणे - ४११ ०४१ )

**यांसी...**

**१. श्री. मयुरेश सुरेश कुलकर्णी** )
वय ४७ वर्षे, धंदा: नोकरी, )
पॅन नं. **AIYPK5787C** ) लिहून देणार
मोबाईल नं.९८८१३ ७२६४१ )

**२. सौ. समृध्दी मयुरेश कुलकर्णी** )
वय ४२ वर्षे, धंदा: नोकरी, )
पॅन नं. **BLSPK2402C** ) लिहून देणार

दोघे राहणार: २७०, आनंदीबाई गाडगीळ )
हॉस्पिटलमागे, दत्तवाडी, पुणे - ४११ ०३० )

**<u>डीड ऑफ असाईनमेंट रक्कम रू.३८,००,०००/-</u>**
**<u>बाजारभावाप्रमाणे किंमत रू.-------/-</u>**

**कारणे डीड ऑफ असाईनमेंट (अभिहस्तांतरण) लिहून देतो की,**

१ : **मिळकतीचे वर्णन :- (अ)** तुकडी पुणे, पोट तुकडी व तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील मे. सब रजिस्ट्रार हवेली नं.१ ते २९ यांचे कार्यक्षेत्रातील तसेच पुणे महानगरपालिका यांचे हद्दीतील गांव मौजे **नऱ्हे** येथील जमिन मिळकत यांसी सर्व्हे नं.४८/४४/२ यांसी क्षेत्र ०० हे ०३.५० आर, सर्व्हे नं.४८/२०/२अ यांसी क्षेत्र ०० हे ०२ आर, सर्व्हे नं.४८/२०/१, यांसी क्षेत्र ०० हे ०४ आर, सर्व्हे नं.४८/२०/२ब यांसी क्षेत्र ०० हे ०२ आर, सर्व्हे नं.४८/२०/३ यांसी क्षेत्र ०० हे ०४ आर, सर्व्हे नं.४८/४५ यांसी क्षेत्र ०० हे ०२.५० आर, असे एकूण क्षेत्र ०० हे १८ आर अशी जमिन मिळकत, यांसी चतु:सीमा येणेप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | : | श्री. कुटे यांची मिळकत, |
| दक्षिणेस | : | श्री. अगरवाल यांची मिळकत, |
| पश्चिमेस | : | रस्ता, |
| उत्तरेस | : | श्री. दादा कुटे यांची मिळकत. |

येणेप्रमाणे चतु:सीमापूर्वक मिळकत त्यातील दगड, विट, माती, जल, तरू, तृण, काष्ट, पाषाण, निधिनिक्षेप इत्यादी सर्व तदंगभूत वस्तुसहित वहिवाटीचे वागणुकीचे व इजमेंटचे सर्व हक्कासुध्दा दरोबस्त व पाणी वापराच्या हक्कासह सदर मिळकत.

## परिशिष्ट 'ब'

परिशिष्ट अ मधील मिळकतीवर बांधलेल्या **श्री दत्त अपार्टमेंट** या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीतील **बी विंग** मधील **चौथ्या** मजल्यावरील **फ्लॅट नं.बी-४०३** यांसी क्षेत्र ८६० **चौ. फूट** म्हणजेच ७९.९२ **चौ. मी. बिल्टअप** येणेप्रमाणे ही मिळकत त्यांतील सर्व हक्कासह दरोबस्त. यांसी चतु:सीमा येणेप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | : | श्री. कुटे यांची मिळकत, |
| दक्षिणेस | : | फ्लॅट नं.बी-४०२, |
| पश्चिमेस | : | फ्लॅट नं.बी-४०४, |
| उत्तरेस | : | श्री. विनोद वीर यांची मिळकत. |

तसेच येथून पुढे सोईकरिता **सदरची मिळकत** असे संबोधण्यात आलेले आहे.

**लोकेशन:- सर्व्हे नं.४८ झोन ---/---- दर रू.-----/------/- प्रती. चौ. मी.**

२: ज्या अर्थी सोबत परिशिष्ट ब मध्यें वर्णन केलेली मिळकत, लिहून देणार यांनी मे. रोहित हिमालय डेव्हलपर्स ॲण्ड बिल्डर्स तर्फे भागीदार श्री. रविंद्र बाळासाहेब चरवड व श्री. नवीन भगतराम अगरवाल यांचेकडून दि.०९/०३/२०११ रोजीच्या रजिस्टर्ड करारनाम्याने घेतलेली असून सदर करारनामा मे. सब रजिस्ट्रार हवेली नं.२० यांचे कार्यालयात दस्त क्र.२०४९/२०११ अन्वये दि.०९/०३/२०११ रोजी नोंद केलेला आहे. तेव्हांपासून सदर फ्लॅट मिळकत लिहून देणार यांचे ताब्यात असून आम्ही मालक म्हणून त्याची वहिवाट करत आहोत. तरी सदर मिळकत अशा स्थितीत ती विक्रीस काढली असता ती तुम्ही विकत घेण्याचे तयारी दर्शविली व त्याप्रमाणे तुमचे व आमचे दरम्यान खरेदीचा व्यवहार करण्याचे ठरले आहे.

३: सदरची मिळकत ही विक्री करून मोबदला स्वीकारण्याचा आम्हांस एकमेव हक्क व अधिकार आहे. त्याप्रमाणे सदरची मिळकत ही आम्ही विक्री करावयाचे ठरविले असता ती तुम्ही विकत घेण्याची तयारी दर्शवून त्याप्रमाणे तुमचे व आमचे दरम्यान सदर मिळकतीची एकूण उक्ती किंमत **रू.३८,००,०००/- (अक्षरी रूपये अडतीस लाख फक्त)** इतकी ठरली आहे. सदरची रक्कम ही आम्हांस मान्य व पसंत पडलेवरून सदर किंमतीस तुम्हांस खरेदी देण्याचे कबूल करून तसा हा डीड ऑफ असाईनमेंट (अभिहस्तांतरण) ताब्यासह तुम्हांस लिहून देत आहोत.

४: सदरची मिळकत ही कोणास गहाण, दान, बक्षिस, लीन, लीज, पोटगी, निवारा, अन्नवस्त्र, कुळ, खंडकरी, करार-मदार इत्यादी अथवा अन्य प्रकारे तबदिल करून कोणत्याही जडजोखमींत गुंतविलेली नाही अगर तसा लेखी वा तोंडी करार केलेला नाही. सदर मिळकतीवर कोणाचा कोणत्याही प्रकारचा कर्जाचा पोटगीचा बोजा अगर चार्ज नाही. सबब सदर मिळकतीबाबत कोणत्याही कोर्टात वादाचा विषय नसून कोर्टाचे कामी जप्त अगर अटॅच झालेली नाही. तसेंच सदरची मिळकत कोठेही अॅक्वायर, रिक्वायर अगर रिझर्व्ह होणेबाबत आम्हांस नोटीस आलेली नाही.

५: येणेप्रमाणे सदर मिळकतीचे तुम्ही तुमचे पुत्र पौत्रादी, वंशपरंपरा, निरंतरपणे, मालकी हक्काने वहिवाट करून उपभोग घ्यावा अथवा मर्जीप्रमाणे व्यवस्था अगर विल्हेवाट करावी. लिहून घेणार यांचे मालकी वहिवाटीस, ताब्यास व उपभोगास लिहून देणार यांचे कोणी भाऊ, भाऊबंद, सावसावकार, वालीवारस, भागीदार, प्रोप्रायटर इत्यादी कोणीही हिल्ला हरकत केल्यास त्याचे निवारण लिहून देणार हे त्यांचे स्वखर्चाने करून देतील, लिहून घेणार यांना त्याची तोषीस लागू देणार नाही.

६: सदर मिळकतीचे फ्लॅटचा आज अखेर पर्यंतचे सर्व प्रकारचे सरकारी व निमसरकारी कर, ग्रामपंचायत टॅक्स, लाईटबिल, पाणीबिल इत्यादी लिहून देणार यांनी भरलेले आहेत. यापुढे येणारे सर्व प्रकारचे सरकारी व निमसरकारी कर, ग्रामपंचायत/पुणे महानगरपालिका टॅक्स, कर, लाईटबिल, पाणीबिल इत्यादी लिहून घेणार यांनी मालकी हक्काने भरावेत. त्याची तोषीस लिहून देणार यांना लागू देणेची नाही. तसेच सदरची मिळकत जशा आहे अशा स्थितीत विक्री करत आहे.

७: सदर मिळकतीस सरकार कागदोपत्री व ग्रामपंचायतीचे/ महानगरपालिकेच्या दप्तरी अथवा सोसायटीचे दप्तरी तसेच पुणे महानगरपालिकेच्या दप्तरी मालक म्हणून लिहून घेणार यांनी त्यांचे नांवाची नोंद करून घ्यावी. त्याकामी लिहून देणार यांची सही संमती लागल्यास विनामोबदला विनाविलंब देवून लिहून घेणार यांचे नावावर करून घ्यावी. त्याबाबत तक्रार अगर हरकत करणार नाही.

८: सदरची मिळकत ज्या इमारतीमध्ये आहे त्या इमारतीतील सर्व गाळेधारकांनी भविष्यामध्ये सहकारी गृहरचना संस्था किंवा अपार्टमेंट असोसीएशन स्थापन केल्यास तर अशा सोसायटीमध्ये सभासद होण्याचे बंधन लिहून घेणार यांचेवर राहिल. तसेच अशा नियोजित सोसायटीचे आवश्यक ते चार्जेस, मेटेनन्स चार्जेस इत्यादी लिहून घेणार यांनी येथुन पुढे भरण्याचे आहे. तसेच सदर नियोजित सोसायटीने वेळोवेळी काढलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे बंधन लिहून घेणार यांचेवर राहिल.

९: लिहून देणार हे सदर मिळकत त्या मिळकतीच्या बांधकामात असलेल्या नळ फिटींग संडास, दारे, खिडक्या, लाईट, फिटींग, मीटर कनेक्शन, बाथरूम, किचनसहीत, कॉमन वाहन पार्कींगसह फ्लॅट व सर्व आज या मिळकतीशी सलग्न असलेल्या उपभोगाच्या सर्व अनुशंगीक वस्तूसहीत व इमारतीत असलेला मालकी हक्क हितसंबध, वहीवाटीचा जाण्यायेण्याचा अधिकार तसेच सदर इमारतीतील असलेले सर्व समाईक सोई सुविधा मिळकतीचे मालकी कारण केल्यामुळे आलेले सर्व हक्क या डीड ऑफ असाईनमेंट (अभिहस्तांतरण) ने लिहून घेणार यांना दिलेले आहेत.

१०:  सदरचे डीड ऑफ असाईनमेंट (अभिहस्तांतरण) महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट ॲक्ट १९६३ किंवा महाराष्ट्र  को- ऑप. सोसायटीज् ॲक्ट १९६०  च्या तरतूदी लागू आहेत व राहतील.

११: भरण्याचा तपशील :

| | | |
|---|---|---|
| रूपये | ४९,०००/- | दि.--/--/२०२६ रोजी NEFT UTR No. ----------- --------- बँक, ------ शाखा, पुणे ने दिले ते मिळाले. |
| रूपये | ५१,०००/- | दि.--/--/२०२६ रोजी NEFT UTR No. ----------- --------- बँक, ------ शाखा, पुणे ने दिले ते मिळाले. |
| रूपये | ३,००,०००/- | चेक नं.------ दि.--/--/२०२६ रोजी --------- बँक, ------ शाखा, पुणेने दिले ते मिळाले. |
| रूपये | ३४,००,०००/- | चेक नं.------ दि.--/--/२०२६ रोजी --------- बँक, ------ शाखा, पुणेने दिले ते मिळाले. |
| **एकूण रूपये** | **३८,००,०००/-** | **एकूण  रूपये अडतीस लाख फक्त** |

भरणा वर कलम १ हयात वर्णन केलेल्या फ्लॅट  मिळकतीचे किंमतीपोटी संपूर्ण भरणा रोख / चेकने मिळाला त्याबाबत तक्रार नाही. वेगळया भरणा पावतीची गरज नाही. वरील संपूर्ण भरणा वटल्यानंतरच सदरचा दस्त ग्राह्य धरण्यात येईल.

१२:  सदर फ्लॅटचा खुला व प्रत्यक्ष ताबा हा या डीड ऑफ असाईनमेंट (अभिहस्तांतरण) ने आजच दिलेला आहे व त्यांनी तो स्विकारला आहे.

१३:   मूळ डेव्हलपर/सोसायटी बरोबर केलेल्या सर्व अटी व शर्ती उभयतांमध्ये बंधनकारक आहेत  व राहतील.

१४:  या प्रमाणे सदरची मिळकत ही लिहून घेणार यांचे नावे करण्यास बिल्डरकडून ना हरकत प्रमाणपत्र लिहून देणार यांनी सादर केलेले आहे.

१५:  सदर डीड ऑफ असाईनमेंट (अभिहस्तांतरण)  उदा. मुद्रांक शुल्क नोंदणी फी, टायपिंग, वकील फी, इत्यादी खर्च हा लिहून घेणार यांनी केलेला आहे.

१६:  सदर मिळकतीचे बांधकाम सन ---- मध्ये पूर्ण झालेले असल्यामुळे त्यावर --% घसारा घेऊन येणारी प्रचलित कायदयानुसार व सरकारी मुल्यांकनाप्रमाणे किंमत रक्कम **रू.-------/-** फक्त  इतकी येत असून प्रत्यक्ष किंमत रूपये **३८,००,०००/-** असून सदर पैकी जास्त किंमतीवर आवश्यक तो मुद्रांक शुल्क व नोंदणी  फी दिली आहे.

- जिल्हाधिकारी कार्यालय पुणे, महसूल शाखा यांनी सदर मिळकतीसाठी अकृषिक परवानगी आदेश क्र.पमह/एनए/एसआर/१३७/०९ अन्वये दि.२५/०३/२०१० रोजी दिलेली आहे.

सबब हा डीड ऑफ असाईनमेंट  (अभिहस्तांतरण)  आम्ही आमचे राजीखुशीने व स्वसंतोषाने लिहून व नोंदवून दिले असून ते आमचेवर व तुमचेवर तसेच उभयतांचे वारसांवर बंधनकारक आहे व राहिल.  ता. म.

लिहून देणार – **१. श्री. मयुरेश सुरेश कुलकर्णी**

| | | |
|---|---|---|
| | | |

लिहून देणार – **२. सौ. समृध्दी मयुरेश कुलकर्णी**

| | | |
|---|---|---|
| | | |

लिहून घेणार – **१. सौ. कबिता चुनीलाल गुरिया**

| | | |
|---|---|---|
| | | |

लिहून घेणार – **२. श्री. चुनीलाल रणजित गुरिया**

| | | |
|---|---|---|
| | | |

साक्षीदार –

| | |
|---|---|
| सही<br><br>नाव<br><br>पत्ता | सही<br><br>नाव<br><br>पत्ता |

\\Manisha\d\All data\Adv K\My Doc\deed of assignment\Marathi - Deed Of Assignment\Deed of Assingment mar GURIA - KULKARNI - Shree Datta Apartment - Flat No.B-403 - Narhe - 23-09-2026.doc